महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ १६ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १७१ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## महापालिका निवडणुकांचे बिगुल वाजले

### १५ जानेवारीला मतदान, तर १६ जानेवारीला लागणार निकाल!

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**राज्य निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेत मोठी घोषणा केली आहे. राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकींची घोषणा निवडणूक आयोगाने केली आहे. मुंबई, ठाण्यासह राज्यातील २९ महानगर पालिकांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. १५ जानेवारीला सर्व महापालिकांसांठी मतदान पार पडणार आहे, तर १६ जानेवारीला निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली आहे.**




**कसा असेल निवडणूक कार्यक्रम?**

- नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याचा कालावधी - २३ ते ३० डिसेंबर
- नामनिर्देशन पत्र छाननी ३१ डिसेंबर २०२५
- उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत २ जानेवारी २०२६
- निवडणूक चिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवार यादी ३ जानेवारी २०२६
- मतदान १५ जानेवारी २०२६ रोजी पार पडेल.
- निवडणूक निकाल १६ जानेवारी २०२६ रोजी लागेल.

#### राज्य निवडणूक आयुक्तांनी काय म्हटलं?

"आजच्या पत्रकार परिषदेत मुदत संपलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घेण्यासाठी करण्यात आलेली कार्यवाही याबाबतची माहिती देण्यासाठी घेण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यातील २९ महापालिका निवडणुकीच्या संदर्भात ही पत्रकार परिषद असून २९ पैकी २७ महापालिकेची मुदत संपलेली आहे. तर ५ महापालिकेची मुदत २०२० मध्येच संपलेली होती. तसेच १८ महापालिकांची मुंबईसह २०२२ मध्ये मुदत संपलेली होती. तसेच ४ महापालिकांची मुदत ही २०२३ मध्ये संपलेली आहे", अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली आहे.

#### दुबार मतदारांना रोखण्यासाठी काय उपाययोजना केल्या?

- दुबार मतदारांना रोखण्यासाठी काय उपाययोजना केल्या आहेत याबाबत बोलताना राज्य निवडणूक आयुक्तांनी सांगितलं की, "या निवडणुकीसाठी संभाव्य दुबार मतदाराची ओळख केलेली आहे. संभाव्य दुबार मतदारांच्या नावासमोर डबल स्टार असं मार्क करण्यात आलं आहे. या मतदारांच्या संदर्भात महापालिका आयुक्तांच्या मार्फत संभाव्य दुबार मतदारांच्या घरी जाऊन सर्वेक्षण करण्यात आलं आहे. तसेच दुबार मतदारांना विचारून तो कुठल्या मतदान केंद्रावर मत देईल हे लिहून घेण्यात आलं आहे. त्या मतदान केंद्राव्यतिरिक्त त्याला इतर कुठेही मतदान करू दिलं जाणार नाही", असं राज्य निवडणूक आयुक्तांनी स्पष्ट केलं आहे.

#### २९ महानगरपालिका क्षेत्रात आचारसंहिता लागू

**राज्यातील २९ महानगरपालिका क्षेत्रात आजपासून निवडणुकीची आचारसंहिता लागू होणार असल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली आहे.**

#### ३१ जानेवारीपर्यंत निवडणूक घेण्याचे न्यायालयाने दिले होते आदेश

गेल्या काही महिन्यांपासून राजकीय आरोप-प्रत्यारोप, न्यायलयीन लढा आणि सरतेशेवटी ३१ जानेवारीच्या अंतिम मुदतीचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्यामुळे चर्चेत असलेल्या राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुका आज अखेर राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केल्या आहेत. १५ जानेवारीला राज्यातील मुंबई, ठाण्यासह एकूण २९ महानगरपालिकांसाठी मतदान होणार असून १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर केले जाणार आहेत.




**लक्षवेधी**

## शिक्षकांना एकस्तर वेतनश्रेणी लागू करा

### शिक्षक भारती संघटनेची मागणी



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर :** आदिवासी व पेसा क्षेत्रात कार्यरत असलेल्या शिक्षक व शैक्षणिक कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ मिळावा, अशी मागणी शिक्षक भारती संघटनेचे ठाणे जिल्हाध्यक्ष एकनाथ तारमळे यांनी शिक्षणाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

आदिवासी व पेसा क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षकांना एकस्तर वेतनश्रेणी देण्याचा सरकारचा निर्णय असतानाही विविध अटी व प्रशासकीय त्रुटींमुळे प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्याचे तारमळे यांनी नमूद केले आहे. आदिवासी विकास विभागाने आश्रमशाळांमध्ये एकस्तर वेतनश्रेणी लागू केली होती; मात्र नंतर त्याची रक्कम परत वसूल करण्याचा तगादा शिक्षकांच्या मागे लागल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. दरम्यान, नुकत्याच दिलेल्या निर्णयात मुंबई उच्च न्यायालयाने पुनर्याचिकेनुसार नाशिक जिल्ह्यातील आदिवासी व पेसा क्षेत्रात कार्यरत शिक्षकांना एकस्तर वेतनश्रेणी लागू करून फरकाची रक्कम देण्याचे आदेश दिले आहेत.

## राष्ट्रीय लोकअदालतीत उल्हासनगरमधून ६१२ प्रकरणे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर :** १३ डिसेंबर रोजी आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीत एकूण ६१२ वाहतूक प्रकरणे दाखल करण्यात आली असून, त्यातून शासनाच्या तिजोरीत चार लाख ४,४०० रुपये दंड स्वरूपात जमा करण्यात आले. राष्ट्रीय लोक अदालतीत उल्हासनगर वाहतूक विभागाने उल्लेखनीय कामगिरी केली. या कारवाईत वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश शिरसाठ, पोलीस हवालदार मोगरे, नाना आव्हाड, भारत खांडेकर तसेच वाहतूक वॉर्डन राहुल ससाणे यांनी सक्रिय सहभाग घेतला. या उपक्रमामुळे प्रलंबित वाहतूक प्रकरणांचा जलद निपटारा होऊन नागरिकांना दिलासा मिळाला असून, कायद्याविषयी जनजागृतीही वाढली आहे. उल्हासनगर वाहतूक विभागाच्या या कार्याची वरिष्ठांकडून प्रशंसा करण्यात येत असून, भविष्यातही अशाच प्रभावी मोहिमा राबविण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे.

## कल्याण, डोंबिवली रेल्वे स्थानकांवर बारा दिवसात ४० मोबाईलची चोरी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** - कल्याण डोंबिवली रेल्वे स्थानकातील भुरट्या चोरांचा उपद्रव वाढत आहे. फलाटावरील प्रवाशांचा मोबाईल चोरणे, लोकलमधील प्रवाशांचा मंचकावरील पिशव्या पळविणे अशा प्रकारच्या गेल्या बारा दिवसाच्या कालावधीत कल्याण, डोंबिवली रेल्वे स्थानकात एकूण ४० घटना घडल्या आहेत.

हे भुरटे चोर रेल्वे स्थानकात प्रवासी म्हणून येतात. घाई गडबडीत, गर्दीत असलेल्या प्रवाशांच्या पिशवीमधील मोबाईल हळूच काढून घेऊन पसार होतात. अनेक प्रवासी लांबपल्ल्याच्या गाड्यांमधील प्रवासासाठी कल्याण रेल्वे स्थानकात येतात. एक्सप्रेसला येण्यास उशीर आहे म्हणून ते रेल्वे स्थानकात रेल्वे तिकीट खिडकी समोर, फलाटावर झोपतात. या संधीचा गैरफायदा घेत भुरटे चोर अशा प्रवाशांच्या विजारीमधील, पिशवीमधील मोबाईल चोरून पळून जातात.

डोंबिवली रेल्वे स्थानक सर्वाधिक वर्दळीचे ठिकाण आहे. या रेल्वे स्थानकावर प्रवाशांची सकाळ, संध्याकाळ गर्दी असते. या गर्दीमध्ये काही भुरटे चोर वावरत असतात. लोकल पकडण्याच्या गडबडीत असलेल्या प्रवाशाच्या हातामधील, पिशवीमधील मोबाईल काढून घेऊन पळून जातात. कल्याण, डोंबिवली रेल्वे स्थानकात दररोज मोबाईल चोरीच्या, लोकलमधील मंचकावर वस्तू विसरून ती पिशवी अन्य कोणी पळून नेल्याच्या दररोज दोन ते तीन घटना घडत आहेत.

## नगराध्यक्ष पदाचे प्रमुख उमेदवार गडगंज श्रीमंत, सीएपासून ते शिक्षण नसलेल्यांपर्यंत

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ :** अंबरनाथ नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी येत्या २० डिसेंबर रोजी मतदान होते आहे. यासाठी आठ उमेदवार रिंगणात आहेत. यातील पाच उमेदवारांची एकूण मालमत्ता ही कोटींच्या घरात आहे. विशेष म्हणजे त्या सर्वांचे पती किंवा सासरे राजकारणात प्रस्थापीत आहेत. आठ उमेदवारांपैकी चार उमेदवार पदवीधर आहेत. तर एक उमेदवार १२ वी, एक नववी तर एक उमेदवाराच्या शिक्षणाची कोणतीही माहिती नाही. यातील एक उमेदवार ७७ वर्षांच्या असून सर्वात कमी वयाच्या उमेदवार ३५ वर्षांच्या आहेत. त्यामुळे नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत चुरस निर्माण झाली आहे.

अंबरनाथ नगर परिषदेची निवडणूक तब्बल साडे दहा वर्षानंतर होते आहे. मात्र या निवडणुकीपूर्वी नगराध्यक्ष पदाच्या आरक्षणात महिलांसाठी ही जागा आरक्षित झाली. त्यामुळे अनेक मोठ्या नेत्यांना नगराध्यक्षपदाच्या स्वप्नावर पाणी सोडावे लागले. मात्र त्यांनी नगर परिषदेची सत्ता आपल्याच हाती कशी राहील आणि आपल्याच कुटुंबियांकडे सुत्रे कशी राहतील यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे अंबरनाथ नगर परिषदेत सर्वच मोठ्या पक्षांनी मोठ्या नेत्यांच्या पत्नी किंवा, सुनेला उमेदवारी दिली. एकूण ८ उमेदवार नगराध्यक्ष पदाच्या




**एक उमेदवार १२ वी, एक नववी तर एक उमेदवाराच्या शिक्षणाची कोणतीही माहिती नाही. यातील एक उमेदवार ७७ वर्षांच्या असून सर्वात कमी वयाच्या उमेदवार ३५ वर्षांच्या आहेत.**

रिंगणात असणार आहेत. यात बहुसंख्य उमेदवार कोट्याधीश आहेत. त्यांची एकूण मालमत्ता ही कोट्यावधींच्या घरात आहेत. रिंगणात असलेल्या ८ उमेदवारांपैकी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी जाहीर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार काँग्रेसच्या उमेदवार नुतन प्रदीप पाटील यांची एकूण मालमत्ता ही ६९.५० कोटींच्या घरात आहे. त्या खालोखाल भाजपच्या उमेदवार तेजश्री करंजुले यांची एकूण मालमत्ता ३० कोटी इतकी आहे. शिंदेंच्या शिवसेनेच्या उमेदवार मनिषा वाळेकर यांची एकूण मालमत्ता ४.०४ कोटी इतकी प्रतिज्ञापत्रात देण्यात आली आहे. तर अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार अश्विनी सचिन पाटील यांची मालमत्ता २.७६ कोटी इतकी आहे.

#### कुणी सीए तर कुणाचे नो स्कुलींग

अंबरनाथ नगर परिषदेच्या निवडणुकीच्या प्रचारात शिक्षण हाही महत्वाचा मुद्दा बनला आहे. यात भाजपच्या उमेदवार तेजश्री करंजुले या सनदी लेखापाल आहेत. तर शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवार अंजली राऊत आणि इंदिरा बैनी पदव्युत्तर पदवीधर आहेत. काँग्रेसच्या नुतन पाटील मुक्त विद्यापीठाच्या पदवीधारक आहेत. अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार अश्विनी पाटील या १२ तर शिंदेच्या शिवसेनेच्या मनिषा वाळेकर या नववीपर्यंत शिकलेल्या आहेत, अशी माहिती प्रतिज्ञापत्रात देण्यात आली आहे.

## शहापूरात पाणीटंचाईला सुरुवात

### धरणांचा तालुका, तरीही पाणीटंचाई कायम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**शहापूर :** शहापूर तालुक्यातील कसारा घाटाच्या खाली असलेल्या नारळवाडी आणि पारधवाडी या आदिवासी वस्त्यांमध्ये डिसेंबर महिन्यातच पाणीटंचाईची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. या भागातील ग्रामपंचायतींनी परिस्थितीची दाहकता लक्षात घेऊन टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी ठाणे जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक पाणीपुरवठा विभागाकडे केली आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही शहापूर तालुक्यातील दुर्गम वाड्यांमध्ये डिसेंबर अखेर पाणीटंचाई जाणवू लागते, मात्र चालू वर्षी तिची सुरुवात अधिक लवकर झाली आहे. कसारा घाटाखालील नारळवाडी, पारधवाडी आणि आसपासच्या आदिवासी वाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याचा तुटवडा तीव्र झाला असून नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे.

पाणीटंचाई हाताळण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतींनी शहापूर पंचायत समिती पाणीपुरवठा उपविभागाला पत्राद्वारे टँकरद्वारे तातडीने पाणी उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे. डिसेंबरपासूनच पाणी टंचाईची सुरुवात झाल्याने उन्हाळयाच्या हंगामात समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

प्रशासनाने वेळेवर प्रभावी उपाययोजना न केल्यास, आदिवासी वस्त्यांतील परिस्थिती आणखी बिकट होऊ शकते, असा अंदाज व्यक्त होत आहे. शहापुरातील ही परिस्थिती दरवर्षीची पुनरावृत्ती ठरत असताना, धरणसमृद्ध तालुक्यातही नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागणे हा प्रशासनासाठी प्रश्नचिन्ह ठरत आहे.

#### धरणांचा तालुका, तरीही पाणीटंचाई कायम

शहापूर तालुक्यात तानसा, वैतरणा, भातसा अशी राज्यातील महत्त्वाची धरणे असूनही दरवर्षी येथे पाणीटंचाई जाणवते. विशेषतः आदिवासी वस्त्यांमध्ये ही समस्या तीव्र होते.स्थानीय नागरिकांच्या मते पाणीटंचाई दूर करण्यासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपयांची योजना केली जाते, मात्र समस्या मात्र कायम राहून प्रत्येक वर्षी उन्हाळ्यापूर्वीच पाणीटंचाई 'उग्र' रूप धारण करते.

## बदलापूर रेल्वे स्थानकात जोधपुर एक्सप्रेस प्रवाशांनी रोखली

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूर :** शनिवारी मध्यरात्री बदलापूर रेल्वे स्थानकात जोधपूर एक्सप्रेस अचानक थांबवण्यात आल्याने मध्य रेल्वेच्या बदलापूर व कर्जत दिशेने जाणाऱ्या लोकल गाड्या एका मागोमाग एक खोळंबल्या होत्या. त्यामुळे सुमारे दीड ते दोन तास रेल्वे सेवा विस्कळीत झाल्याने प्रवासी लोकलमध्ये अडकून पडले. अनेक प्रवाशांनी चालत बदलापूर रेल्वे स्थानक गाठले. त्यामुळे रात्री उशिरा घरी परतणाऱ्या चाकरमान्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. शनिवारी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास बदलापूर रेल्वे स्थानकात जोधपूर एक्सप्रेस अचानक थांबविण्यात आली. या एक्सप्रेसमधील एका डब्यात प्रवाशांचे साहित्य चोरीला गेल्याचा आरोप करीत संतप्त प्रवाशांनी दोन वेळा साखळी खेचल्याने बदलापूर



स्थानकात ही एक्सप्रेस थांबविण्यात आली. एक्सप्रेस बदलापूर रेल्वे स्थानकात पोहोचल्यानंतर काही प्रवासी थेट रेल्वे रुळावर उतरले. त्यात एक्सप्रेस अचानक थांबवण्यात आल्यामुळे रात्रीच्या वेळेत कर्जत, खोपोली, बदलापूर स्थानकात येणाऱ्या लोकल गाड्या एकाच मार्गावर एकामागोमाग एक खोळंबून राहिल्या होत्या. त्यामुळे रेल्वे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत प्रवाशांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. त्यात प्रवासी आणि रेल्वे सुरक्षा दलाच्या जवानांमध्ये चर्चा सुरूच असताना अचानक काही वेळ थांबलेली एक्सप्रेस गाडी सुरू झाली. त्यामुळे संताप व्यक्त करण्यासाठी स्थानकावर उतरलेले अनेक प्रवासी फलाटावरच राहिल्याने पुन्हा गोंधळात भर पडली.

मागून खोपोली लोकल येत असल्याने रेल्वे सुरक्षा दलाच्या जवानांनी या प्रवाशांना तात्काळ फलाटावर घेतले. आणि त्यानंतर मागून येणाऱ्या खोपोली लोकलमध्ये या प्रवाशांना बसवून एक्सप्रेसपर्यंत सोडण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाचे जवानही त्यांच्यासोबत मार्गस्थ झाले. त्यानंतर खोळंबलेल्या लोकल गाड्या बदलापूर आणि कर्जत दिशेने सोडण्यात आल्या. मात्र या संपूर्ण गोंधळात मोठे हाल झाल्याने रात्री उशिरा घरी जाणाऱ्या चाकरमान्यांना प्रचंड मनस्तापाला सामोरे जावे लागले. या गाडीमध्ये बसलेल्या प्रवाशांना वलसाड पासूनच मोठ्या मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप प्रवाशांनी बदलापूर रेल्वे स्थानकात आल्यावर केला.



दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com
पान : ०२
ठाणे ■ मंगळवार
१६ डिसेंबर २०२५

# विकासाच्या नावावर मतं मागणार – शिवसेना जिल्हा प्रमुख अरविंद मोरे

## प्रभाग क्र. 9 मध्ये विविध विकासकामांना सुरवात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शिवसेनेच्या माध्यमातून विकासकामे करून दाखवली असून या विकासाच्या नावावरच मतं मागणार असल्याची प्रतिक्रिया शिवसेना जिल्हा प्रमुख अरविंद मोरे यांनी दिली. कल्याण पश्चिमेतील प्रभाग क्र. 9 मध्ये विविध विकासकामांचे भूमिपूजन करत या विकासकामांना सुरवात करण्यात आली यावेळी अरविंद मोरे बोलत होते. शिवसेनेचे मुख्य नेते तथा



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या महसूल निधीतून कल्याण पश्चिमेतील रामबाग येथील धोंडीराम कदम चौक ते जरीमरी नाला येथील रस्ता सिमेंट कॉँक्रीटीकरण करणे व गटार तयार करणे, महारनगर जिजामाता कॉलनी परिसरात रस्ता कॉँक्रीटीकरण करणे, झुंझारराव मार्केट परिसरात रस्ता कॉँक्रीटीकरण करणे या कामांसाठी निधी प्राप्त झाला आहे. जिल्हा प्रमुख अरविंद मोरे यांनी यासाठी विशेष पाठपुरावा केला होता. एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून जोशीबाग, मल्हार नगर, चिखले बाग, रामबाग परिसरात 15 कोटींचा निधी प्राप्त झाला होता त्या निधीतून हि कामे होत आहेत.

प्रभाग क्र. 9 मध्ये माजी नगरसेवक श्रेयस समेळ, युवासेनेचे प्रतिक पेणकर आणि आपल्या माध्यमातून हा निधी आणला असून विकासाच्या नावावर याठिकाणी मते मागणार असून शिवसेने याठिकाणी विकासाची गंगा आणली असल्याची माहिती जिल्हाप्रमुख अरविंद मोरे यांनी दिली. यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख अरविंद मोरे, माजी नगरसेविका अस्मिता मोरे, माजी नगरसेवक श्रेयस समेळ, युवासेना जिल्हा प्रमुख अभिषेक मोरे, लोकसभा प्रमुख प्रतिक पेणकर, मुन्ना शहा, बंटी कुलकर्णी, भिम जाधव, संतोष बोंबले, हेमंत सांगळे, उदय राकीबे, संतोष घोलप. राजू कोटियन आदींसह प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सनातन प्रवाहाच्या आड येणाऱ्यांना सहन करणार नाही

## - गजेंद्रसिंह शेखावत, केंद्रीय संस्कृतिक मंत्री



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

दिल्ली येथील सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव हा केवळ उत्सव नव्हे, तर भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागृतीचा उदघोष करणार हा एक उत्सव आहे. अयोध्येत प्रभुश्रीरामाची पुनर्स्थापनेनंतर कालचक्र पालटल्याचे आणि भारतीय संस्कृतीचा पुन:श्च उदय होऊ लागल्याचे दिसू लागले आहे. देश आज सांस्कृतिक पालटाची स्थिती अनुभवत आहे. सनातन धर्म हा कुणाच्याही विरोधात नाही; मात्र सनातन प्रवाहाच्या आड योणाऱ्यांना सहन केले जाणार नाही, असे ठाम प्रतिपादन केंद्रीय पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्री श्री. गजेंद्रसिंह शेखावत यांनी केले. ते नवी दिल्ली येथील भारत मंडपम् येथील 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'त बोलत होते. मा. शेखावतजी पुढे म्हणाले की, सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांनी गेली २५ वर्षे संस्थेच्या कार्यातून केवळ साधकांची आध्यात्मिक उन्नती केलेली नाही, तर समाजाला नैतिकता, राष्ट्रबोध, तसेच सर्वांत महत्त्वाचे म्हणजे समाजात धर्मचेतना निर्माण केली आहे.

**काशी-मथुराच नव्हे, तर देशातील प्रत्येक मंदिर मुक्त होईपर्यंत लढ्याचा निर्धार करा ! - अधिवक्ता विष्णु जैन**

अनेक राज्यांमध्ये सरकार केवळ हिंदूंची मंदिरेच का ताब्यात घेते ? सरकारला मशिदी, चर्चेस यांतील गैरव्यवस्थापन दिसत नाही का ? शासन मंदिर मुक्तीचा कायदा कधी आणणार?, तसेच आपण सर्वच हिंदूविरोधी कायदे संपवण्याची मागणी लावून धरली पाहिजे ! केवळ काशी विश्वनाथ आणि श्रीकृष्ण जन्मभूमीच नाही, तर देशातील अतिक्रमण केलेले प्रत्येक हिंदू मंदिर मुक्त होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा निर्धार आपण केला पाहिजे, असे आवाहन सर्वोच्च न्यायालयातील अधिवक्ता विष्णु शंकर जैन यांनी केले.

**शंखनाद महोत्सवामुळे धर्म-अधर्माच्या युद्धात धर्माचाच विजय निश्चित ! - आलोक कुमार, विहिंप**

शंखनाद हा धर्म-अधर्म युद्धाच्या वेळी केला जातो. भारताच्या राजधानीत होत असलेल्या 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'मुळे धर्म-अधर्माच्या युद्धात धर्माचाच विजय निश्चित होईल, याची खात्री वाटते. दिल्ली येथे हल्लीच आतंकवादी आक्रमण झाले. हे आतंकवादी उच्चशिक्षित होते आणि यामुळे जिहाद हा गरीबी, अशिक्षितपणा, मुलभूत गरजा नसणे आदींमुळे वैफल्यग्रस्त होऊन केला जातो, हा भ्रम नष्ट झाला आहे. अल्पसंख्याकांना दिलेल्या विशेषाधाकारांचा पुनर्विचार झाला पाहिजे, असे विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय कार्याध्यक्ष आलोक कुमार म्हणाले.

**'जनसंख्या जिहाद' रोखणे अत्यावश्यक ! - डॉ. सुरेश चव्हाणके, सुदर्शन न्यूज नेटवर्क**

'हिंदू शस्त्राच्या लढाईत सक्षम आहे; मात्र तो वैचारिक लढ्यामध्ये कमी पडतो. हिंदूंना 'हम दो, हमारे दो' असा शिकवण दिली गेली आणि आज हिंदूंचा देहली येथे जन्मदार १.१, मुंबई येथील जन्मदर १.३ अशी दयनीय स्थिती झाली आहे. अनेक देश हे जन्मदर वाढवल्याने इस्लामी देश झाले, तर काही देश घुसखोरीमुळे इस्लामी झाले आहेत. घुसखोरांना देशातून हाकलून लावण्यासाठी देशात 'एन्.आर्.सी.' लागू केली पाहिजे, असे प्रतिपादन सुदर्शन न्यूजचे संपादक डॉ. सुरेश चव्हाणके यांनी केले.

# पेण येथे महिला सुरक्षेचा प्रश्न गंभीर



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : पेण पोलीस ठाण्यात नोंद झालेल्या एका धक्कादायक प्रकरणात ओळखीच्या व्यक्तिकडून महिलेस शारीरिक व मानसिक छळ, धमक्या आणि बदनामीचा प्रयत्न झाल्याचे उघड झाले आहे. लग्नाचे अमिष दाखवून शारीरिक संबंध प्रस्थापित केल्यानंतर आरोपीने लग्नास नकार देत गंभीर धमक्या दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. फिर्यादीच्या तक्रारीनुसार, आरोपीने लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. मात्र, लग्नाची वेळ आल्यावर त्याने अचानक नकार दिला. फिर्यादीने दुसऱ्या व्यक्तीसोबत लग्न करणार असल्याची माहिती दिल्यानंतर आरोपीने "तुझे दुसरे कोणाशी लग्न मी होऊ देणार नाही" अशी धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे. आरोपीने फिर्यादी व स्वतःचे एकत्र फोटो अनोळखी मोबाईल क्रमांकावरून तिच्या नवऱ्याला पाठवण्याची धमकी देत बदनामी करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. 275/2025 नोंदवण्यात आला असून, भारतीय दंड संहिता कलम 69, 351(2) व 356(2) अंतर्गत कारवाई सुरू आहे. या प्रकरणाचा अधिक तपास महिला पोलीस उपनिरीक्षक वेगुर्लेकर करत आहेत.

**महिलेस धमक्या व मानसिक छळ प्रकरणी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल**

या घटनेमुळे स्त्रियांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. अशा धमक्या व बदनामीचे प्रयत्न महिलांच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम करू शकतात. पोलिसांनी तातडीने संरक्षणात्मक पावले उचलली असून आरोपीच्या अटकेची शक्यता वर्तवली जात आहे. स्थानिक नागरिकांनीही कठोर कारवाईची मागणी करत समाजात जागरूकतेचे आवाहन केले आहे.

# आगरी महोत्सवाच्या भव्यतेने भारावलो

## : डॉ. श्रीकांत शिंदे



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : अखिल भारतीय आगरी महोत्सवाच्या आयोजनातील भव्यतेने भारावलो असून, २१ वर्षांपासून सुरू असलेल्या महोत्सवातून आगरी समाजाबरोबरच डोंबिवलीच्या संस्कृतीचेही संवर्धन होत आहे, असे भावपूर्ण उद्गार शिवसेनेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी रविवारी येथे काढले. डोंबिवलीत २१ वा अखिल भारतीय आगरी महोत्सव सुरू असून, डॉ. श्रीकांत शिंदे यांनी रविवारी सायंकाळी महोत्सवाला भेट दिली. महोत्सवाचे अध्यक्ष शरद पाटील यांनी खासदार शिंदेंचे

**खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिली आगरी महोत्सवाला भेट**

स्वागत केले. या वेळी भाऊसाहेब चौधरी, राजेश कदम यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

अखिल भारतीय आगरी महोत्सवाचे यंदा २१ वे वर्ष असून, आगरी महोत्सवाच्या भव्यतेने भारावलो आहे. आगरी समाजाच्या प्रगतीबरोबरच डोंबिवलीची संस्कृतीही वृद्धींगत करण्याचे कार्य आगरी युथ फोरमकडून केले जात आहे. या उत्सवाची डोंबिवलीकरांकडून आतुरतेने वाट पाहिली जाते. अशा पद्धतीने या महोत्सवाने नागरिकांच्या मनात स्थान निर्माण केले आहे, असे प्रतिपादन खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केले.

संत सावळाराम महाराज म्हात्रे यांच्या स्मारकासाठी दहा एकर जागा मंजूर करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे यांचे योगदान महत्वाचे आहे, याचा आवर्जून उल्लेख करीत आगरी युथ फोरमचे अध्यक्ष गुलाब वझे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. अखिल भारतीय आगरी महोत्सवात चार वर्षांपासून एका कार्यक्रमाचे प्रायोजकत्व श्रीकांत शिंदे फाउंडेशनकडून केले जात आहे, याबद्दल गुलाब वझे यांनी आभार मानले. या वेळी महोत्सवाचे कार्याध्यक्ष जालिंदर पाटील, सरचिटणीस रामकृष्ण पाटील, खजिनदार पांडुरंग म्हात्रे, चिटणीस गुरुनाथ म्हात्रे आदी उपस्थित होते.

# रस्ता रूंदीकरण करताना बाधितांना एमएम आरडीए धर्तीवर मोबदला देण्यात यावा

## - आ.रईस शेख याची मागणी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी शहरात होत असलेले रस्ता रुंदीकरण हे शहर विकासासाठी अत्यावश्यक आहे.परंतु ते करीत असताना बाधित होणाऱ्यांना मोबदला देण्यात यावा अशी मागणी महापालिका आयुक्त व शासनाकडे केली आहे.हा मोबदला एम.एम.आर.डीए च्या धर्तीवर बाधितांना देण्यात यावा यासाठी मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी करीत विधानसभेत ही याबाबत मागणी केल्याची माहितीभिवंडी चे आमदार रईस शेख यांनी केल्याचे सांगितले. भिवंडी पूर्व विधानसभेचे आमदार रईस शेख यांनी शासन स्तरावर मागणी करू केलेल्या विविध २० कोटी २७ लाख रुपयांच्या विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण बाबतीत माहिती देण्यासाठी पत्रकार परिषद आयोजित केली होती.

आ.रईस शेख यांनी १६ व १७ डिसेंबर रोजी शहरातील पद्मानगर,शांतीनगर, फातिमा नगर, सिराजूल कब्रस्तान या परिसरात विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन आयोजित केले होते.परंतु तत्पूर्वीच महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाकडून आज सोमवारी चार वाजता पत्रकार परिषदेचे आयोजन केल्यामुळे आमदार शेख यांनी आपल्या जनसंपर्क कार्यालयात दुपारी तीन वाजता या सर्व विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन प्रातिनिधिक स्वरूपात जाहीर केले आहे.याप्रसंगी समाजवादी पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष अजय यादव ,सलाम नोमानी व पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहराचा विकास पर्यायाने भिवंडी पूर्व विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना चांगल्या नागरीसुविधा देण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.विकासकामाचे जोरावर महानगर पालिका निवडणुकीत समाजवादी पार्टी मोठा विजय संपादन करेल असा विश्वास आ.रईस शेख यांनी व्यक्त करीत ,विधानसभा हिवाळी अधिवेशनात भिवंडी शहरातील अनेक प्रश्न उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधण्यात आपण यशस्वी झालो असल्याचे त्यांनी सांगितले.

# सिमेंट रस्ते आणि वाढते श्वसन विकाराचे रुग्ण एक नवी समस्या

## - सी आर.म्हात्रे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**पेण** : पेणसह संपूर्ण कोकणात गेल्या काही वर्षात सिमेंट रस्त्यांचे जाळे झपाट्याने वाढले आहे, ग्रामपंचायती पासून,नगरपरिषद,सार्वजनिक विभागापर्यंत सिमेंटचे रस्ते म्हणजे विकासाचाच अजेंडा झाला आहे.डांबरी रस्त्यांच्या तुलनेने टिकाऊ,मजबूत आणि दीर्घकालीन फायदेशीर अशीच प्रतिमा सरकारने उभी केली आहे. परंतु या सिमेंट रस्त्यांच्या कडेला निर्माण होणारी सूक्ष्म धूळ ,त्यातील सिमेंट कण हवेतून श्वसनामार्फत शरीरात प्रवेश करून आज ग्रामीण आणि शहरी भागात श्वसन आजाराची त्सुनामी निर्माण होत असल्याची वस्तुस्थिती समोर येत आहे. प्रतिक्रिया पेण वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी दिली.

ते पुढे म्हणाले की सिमेंट रस्त्यामुळे निर्माण होणारी सूक्ष्म धूळ अदृश्य पण खूप घटक आहे. सिमेंट रस्त्ये बांधताना किंवा बांधून झाल्यावर कडेला उरलेले मिश्रण,तुटलेली कड,अपूर्ण पाण्याची साठवण , बस आणि चारचाकीचा वेग या सर्वांमुळे पांढरी धूळ तयार होते. मात्र डांबरी रस्त्यांमध्ये ही धुळीचे प्रमाण अत्यल्प होते. ही पांढरी धूळ p.m.२.५ आणि p.m १० प्रकारातील कणानी बनलेली असते. ती फुफ्फुसात सरळ शिरते .सिमेंट मधील सिलिका,चुनखडी, प्लाय अँश चे घटक दीर्घ काळ श्वसन नलिकेत गेल्याने दमा ' खोकला सायनस ' ब्रांका यटीस ' वाढतो असेही सांगितले

तसेच शहरातील काही वर्षात वाढलेल्या रस्त्यामुळे किराणा दुकाने ,रस्त्यालगतची घरे, शाळा ,कार्यालये ,परिसर याच्या समोर पदपथ येथे हे पांढ्या धुळीचे थर दिसून येतात.हीच धूळ लहान मुले, वृद्ध,आणि रस्त्याच्या कडेला असणाऱ्या विक्रेता यांना त्रासदायक ठरत असून भविष्यात वाढता धोका निर्माण होईल अशी शंका व्यक्त केली.

प्रत्येक घरात दिवसेंदिवस दमा, अलर्जीचे रुग्ण दिसत आहेत. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार मागील काही वर्षात सिमेंट रस्त्यामुळे ही रूग्ण संख्या वाढत आहे. महिला, वृद्ध, लहान मुले ,यामध्ये सायनसची समस्या वाढत आहे.सिमेंट रस्ते जरी टिकाऊ असले तरी सामान्यांना आरोग्यावरील होणारा दवाखान्यातील खर्च मात्र सतत वाढत आहे. लोकप्रतिनिधी विविध निधी आणून सिमेंट रस्ते बनवून घेतले आहेत. मात्र काही दिवसातच झालेली रस्त्यांची अवस्था,यातून जी धूळ निर्माण होते त्यामुळे आरोग्य केंद्रावर दमा सदृश्य आजाराचे रुग्ण प्रमाण वाढत आहे .पावसाळ्यात ही प्रमाण खूप कमी असते मात्र उन्हाळ्यात ही संख्या दुप्पट होते.

रस्त्याच्या कडेला असणारी गवत सदृश्य ग्रीन कव्हर नाहीशी होत आहे,वृक्ष संख्या घटत आहे.त्यामुळे नैसर्गिक धूळ रोखण्याची यंत्रणाच संपली आहे त्यामुळे ही धूळ जास्त प्रमाणात दिसते.पाणी फवारणी खर्चिक असल्याने ती फवारणी केली जात नाही.महत्वाचे म्हणजे रस्त्याच्या कडेला असणारा मटेरियल उचलला जात नाही.कंत्राटदार उदासीन असतो,त्यावर सरकारी बाबू लक्ष देत नाहीत,सूचना देत नाहीत त्यामुळे ही सर्व घडत असते. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणजे दीर्घकालीन फुफ्फुसाचे आजार वाढतात ,ही देण पुढच्या पिढीकडे आपोआप वर्ग होते.फुफ्फुसाचे संसर्गजन्य रोग वाढत आहेत,लहान मुलांना या धुळीच्या मुळे मेंदूच्या विकारांवर परिणाम होतो. वृद्ध मध्ये हृदय रोग वाढताना विसून येत आहे. एकीकडे विकासासाठी सिमेंट रस्त्ये बनतात आणि दुसरीकडे समाजाची फुफ्फुसे कमकुवत होतात. मग हा विकास शापित आहे अशेच नाईलाजाने म्हणावे लागेल अशी खंतही व्यक्त केली.

यासाठी रस्ते बांधकाम झाल्यानंतर सर्व उरलेला मटेरियल उचलला गेला पाहिजे,ज्याठिकाणी वस्ती आहे,शाळा आहेत,कार्यालये आहेत त्याठिकाणी पाणी शिंपला पाहिजे.रस्त्याच्या कडेला शक्य असेल तर गवत सदृश्य ग्रीन कव्हर तयार केली पाहिजे. नाहीतर डांबरी रस्त्येच बरे होते अशी म्हणण्याची वेळ येईल.सिमेंट रस्ते टिकाऊ असले तरी आरोग्य पण टिकले पाहिजे. असेही सी आर म्हात्रे यांनी सांगितले.

# डोंबिवली पश्चिमेत वातानुकूलित अभ्यासिकेचा लोकार्पण सोहळा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : डोंबिवली पश्चिमेकडील प्रभाग क्रमांक 24 चे माजी नगरसेवक रणजीत रामदास जोशी आणि माजी नगरसेविका वृषाली रंणजीत जोशी यांच्या संकल्पनेतून प्रभागातील गरजू विद्यार्थ्यांना नवीन वातानुकूलित अभ्यासिका तयार केली आणि त्याचे लोकार्पण सोहळा दिनांक 15 डिसेंबर 2025 रोजी अकरा वाजता कल्याण ग्रामीणचे आमदार, राजेश गोवर्धन मोरे, ज्येष्ठ माजी नगरसेवक रमेश म्हात्रे , विश्वनाथ राणे, माजी सौ.महापौर विनिता राणे, माजी नगरसेवक संजय पावशे सौ. अपर्णा संजय पावशे प्रभागाचे जेष्ठ नागरिक, आणि महिला






आघाडी या सर्वांच्या उपस्थिती या सुंदर अत्याधुनिक, वातानुकूलित अभ्यासिकेचे लोकार्पण करण्यात आले. दरम्यान प्रभागातील सर्व विद्यार्थ्यांनी श्री आणि सौ रणजीत जोशी यांचे खूप खूप आभार मानले. या कार्यक्रमात आलेल्या ज्येष्ठ नागरिक संघाने ज्येष्ठ नागरिकांना मीटिंगसाठी आणि एकत्रित गप्पा मारण्यासाठी ज्येष्ठ नागरिक सभागृह असावे अशी मागणी केली होती यावेळी कल्याण ग्रामीण आमदार राजेश गोवर्धन मोरे, माजी नगरसेवक रमेश म्हात्रे, या सर्वांनी मिळून ज्येष्ठ नागरिकांना सभागृह देण्याचे आश्वासित केले या मुळे आनंदित झालेल्या ज्येष्ठ नागरिकांनी सर्वांचे मनसोक्त आभार मानले आणि कौतुक केले.

# भविष्यवेध



मंगळवार
१६ डिसेंबर २०२५

**मेष**
अंतर्गत समृद्धी आणि आत्मविश्वास वाढेल. आज तुम्ही आजूबाजूच्या लोकांशी अधिक चांगले नाते निर्माण कराल आणि स्वतःला सकारात्मक आणि यशस्वी वाटेल.

**वृषभ**
तुम्ही तुमच्या भावना स्पष्टपणे व्यक्त करू शकाल, ज्यामुळे नाती अधिक दृढ होतील. जोडीदारासोबत संवाद गोड आणि मनापासून होईल.

**मिथुन**
सामाजिक जीवनातही हा काळ अनुकूल असून नवीन मित्र मिळू शकतात तसेच जुन्या मित्रांशी भेट होऊ शकते. खुले मन ठेवा आणि भावना व्यक्त करा.

**कर्क**
आध्यात्मिक आणि वैयक्तिक प्रगतीत काही अडथळे येऊ शकतात. आत्मपरीक्षणाचा हा काळ आहे. नात्यांमध्ये चढ-उतार संभवतात.

**सिंह**
मतभेदांमुळे मानसिक अस्वस्थता येऊ शकते. संयम ठेवा आणि संवादातून प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करा. हे अनुभव तुम्हाला महत्त्वाचे धडे देतील.

**कन्या**
अंतर्गत शक्ती ओळखा आणि शांत राहा. परिस्थितीबाबत संभ्रम जाणवेल. नात्यांमध्ये चढ-उतार होऊ शकतात. संयम ठेवा; परिस्थिती हळूहळू सुधारेल.

**तुळ**
संवेदनशील विषयांवर बोलताना काळजी घ्या. नकारात्मकता टाळा आणि सकारात्मकतेकडे वाटचाल करा. मनातील भावना प्रामाणिकपणे व्यक्त करा.

**वृश्चिक**
अविवाहितांना नवीन ओळखी होण्याची शक्यता आहे. सत्य आणि प्रामाणिकपणा नात्यांतील समज वाढवेल. हा काळ नात्यांमध्ये सौहार्द निर्माण करेल.

**धनु**
सकारात्मक ऊर्जा लोकांना आकर्षित करेल. कुटुंब आणि मित्रांसोबत वेळ घालवल्याने आनंद मिळेल. आत्मविश्वास वाढेल आणि कोणतेही आव्हान सहज पेलू शकाल.

**मकर**
नवीन नात्यात अधिक जवळीक जाणवेल. आजचा दिवस आनंद आणि सकारात्मकतेने भरलेला असेल. मानसिक ताण आणि गोंधळ जाणवेल.

**कुंभ**
निर्णय घेताना अडचणी येऊ शकतात. संयम आणि सहनशीलता वाढवण्याचा हा काळ आहे. नात्यांमध्ये संवाद ठेवल्यास अडचणी सुटू शकतात.

**मिन**
भावनांवर नियंत्रण ठेवा. या अनुभवातून शिकण्याची संधी मिळेल. संवाद कौशल्य प्रभावी ठरेल आणि नाती मजबूत होतील. जीवनात संतुलन येईल.

# ठाणे शहरात 50 टक्के पाणी कपात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

ठाणे : कल्याण फाटा येथील महानगर गॅसच्या कामांमध्ये ठाणे शहराला पाणीपुरवठा करणारी पिसे बंधारा येथून टेमघर जलशुध्दीकरण केंद्राकडे पाणी वाहून आणणारी 1000 मि.मी व्यासाची जलवाहिनी चार ते पाच वेगवेगळ्या ठिकाणी दिनांक 11 डिसेंबर 2025 रोजी नादुरूस्त झाली होती, सदर जलवाहिनी दुरूस्त करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे, परंतु या कामास आणखी 4 दिवसाचा कालावधी लागण्याची शक्यता आहे, त्यामुळे ठाणे शहरात 19 डिसेंबर 2025 पर्यत 50 टक्के पाणी कपात लागू करण्यात येत आहे. पाणीपुरवठा विभागामार्फत जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम तातडीने व जलदगतीने करण्यात येत आहे. मात्र जलवाहिनी जुनी व प्रिस्ट्रेस काँक्रीट पद्धतीची असल्यामुळे दुरुस्तीच्या कामासाठी विलंब होत असून हे काम पूर्ण होण्यास अजून 4 दिवसांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. परिणामी, ठाणे शहराकडे येणारा पाणीपुरवठा कमी झाला असून शहरांमध्ये 50 टक्के पाणी कपात लागू करण्यात येत आहे.

शहरामध्ये पाणी वितरणाचा समतोल ठेवण्यासाठी दि. 19.12.2015 पर्यंत प्रत्येक भागास दिवसातून 12 तास झोनिंग पद्धतीने पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. यामुळे नागरिकांना कमी प्रमाणात व अनियमित पाणीपुरवठा होईल. नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा व महापालिकेत सहकार्य करावे असे आवाहन पाणीपुरवठा विभागामार्फत करण्यात येत आहे.

# ऊर्जा संवर्धन दिनाचे औचित्य साधून केडीएमसीतर्फे आयोजित चर्चासत्राला नागरिकांचा मोठा प्रतिसाद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : ऊर्जा संवर्धन दिनाचे औचित्य साधून कल्याण डोंबिवली महानगरपालिका आणि डोंबिवली रोटरी क्लब ऑफ डोंबिवली ईस्टतर्फे आयोजित चर्चासत्राला डोंबिवलीकरांनी मोठा प्रतिसाद दिला. केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतून डोंबिवली पूर्वेतील रोटरी भवन येथे आयोजित या अनोख्या उपक्रमाला डोंबिवली परिसरातील 150 हून अधिक गृहसंकुलांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



शाश्वत आणि सुरक्षित शहर विकासासाठी महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या पुढाकाराने 7 कलमी मुद्द्यांची मांडणी करण्यात आली आहे. आयुक्त अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतून आणि विद्युत - यांत्रिकी विभागाचे अतिरिक्त शहर अभियंता

### आयुक्त अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतून झालेल्या उपक्रमाचे डोंबिवलीकरांकडून विशेष कौतुक

प्रशांत भागवत यांच्या समन्वयातून कल्याण पाठोपाठ डोंबिवलीतही हा महत्त्वपूर्ण कार्यक्रम घेण्यात आला. ज्यामध्ये कचरा व्यवस्थापन, सौरऊर्जा, पावसाचे पाणी साठवण, सांडपाण्याचा पुनर्वापर, वृक्ष लागवड, विद्युत सुरक्षा आणि अग्निसुरक्षा या सात मुद्द्यांचा समावेश असून त्याबाबत उपस्थित नागरिकांमध्ये तज्ञ व्यक्तींच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.

"या सात मुद्द्यांवर कल्याण डोंबिवलीतील गृहसंकुलांनी प्रभावीपणे काम करण्याची गरज ओळखून कल्याण आणि डोंबिवलीमध्ये हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले. येत्या काळात कल्याण डोंबिवलीतील प्रत्येक लहान मोठ्या निवासी संकुलापर्यंत हा 7 कलमी कार्यक्रम पोहोचवण्याचा महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांचा मानस आहे. त्यादृष्टीने कल्याणपाठोपाठ डोंबिवलीतही डोंबिवली रोटरी क्लब ऑफ ईस्टचे माधव चिकोडी यांच्या विशेष सहकार्याने हा उपक्रम घेण्यात आला. दरम्यान यावेळी उपस्थित नागरिकांनी शाश्वत आणि सुरक्षित विकास हा कार्यक्रम सोसायटीनिहाय घेऊन सोसायटीनुसार त्याची अंमलबजावणी करावी अशी मागणी यावेळी उपस्थित नागरिकांनी केली.

# कल्याण ग्रामीणच्या शेतकरी आणि नागरिकांच्या अन्यायाविरोधात विधानसभेत आवाज

## आमदार राजेश मोरे यांनी मांडला विधानसभा अधिवेशनात प्रश्न

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण ग्रामीणच्या शेतकरी आणि नागरिकांच्या अन्यायाविरोधात टोरेंट पॉवर कंपनीच्या मनमानी व दडपशाही कार्यवाहीवर कल्याण ग्रामीणचे शिवसेना आमदार राजेश मोरे यांनी विधानसभेत आवाज उठवला. अतिरिक्त वीज वसूली, खोटे गुन्हे, दादागिरी आणि मृत्यू प्रकरणावर विधानसभेत मोरे यांनी सवाल करत ठेका रद्द करणे, थकबाकी माफी व पीडित कुटुंबाला 1 कोटी रुपयांच्या मदतीची मागणी यावेळी करण्यात आली.

महाराष्ट्र विधानसभेच्या अधिवेशनात तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीत कल्याण ग्रामीण येथील नागरिकांवर टोरेंट पॉवर लिमिटेडकडून होत असलेल्या अन्यायकारक वीज वसूलीबाबत विधानसभेत अत्यंत गंभीर मुद्दा आमदार राजेश मोरे यांनी उपस्थित केला. दातिवली, दिवा, साबे, बेतवडे, म्हातार्डी, आगसन, खरडी, शिल, पडगा, मोठी देसाई, देसाईचे पाच पाडे, पडले, खिडकाळी, डायघर, दहिसर, मोकाशी, वालीवली, पिंपरी, निघू, वाकलण, बामर्ली, नारिवली, भाले, नागांव, उत्तरशिव गोठेकर, कर्मनगर, ठाकुर पाडा आणि इतर गावे या सर्व गावांमधील शेतकरी व नागरिकांवर टोरेंट पॉवर कंपनीकडून जबरदस्तीने अतिरिक्त वीज वसूली, खोटे गुन्हे दाखल करणे, दादागिरी आणि दडपशाही स्वरूपाची मनमानी कार्यवाही सुरू असल्याचे सभागृहाच्या निदर्शनात आणून देण्यात आले.

या अन्यायकारक कारवाईमुळे शेतकरी व गरीब नागरिक प्रचंड त्रस्त झाले असून, टोरेंट पॉवरचा ठेका तत्काळ रद्द करण्यात यावा, २०२४ पर्यंतची वीज थकबाकी पूर्णतः माफ करण्यात यावी, शेतकऱ्यांवर दाखल केलेले सर्व खोटे गुन्हे मागे घेण्यात यावेत, शेतजमिनीत पोल व ट्रान्सफॉर्मर टाकल्याबद्दल योग्य मोबदला देण्यात यावा, अश्या ठोस मागण्या करण्यात आल्या. यासोबतच दातिवली गावात विद्युत लाईनमुळे शॉक लागून मृत्यू झालेल्या तरुणाच्या प्रकरणात दोषी अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, मृत कुटुंबाला रु १ कोटीची आर्थिक मदत देण्यात यावी व कुटुंबातील एका सदस्याला नोकरी देण्यात यावी, अशी ठाम मागणी सभागृहात करण्यात आली.

या संपूर्ण विषयावर उत्तर देताना राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डिकर यांनी सकारात्मक कार्यवाही करण्याचे ठोस आश्वासन विधानसभेत दिले असल्याची माहिती आमदार राजेश मोरे यांनी दिली.

# डोंबिवलीत नव्याने जलकुंभ उभारण्याच्या कामाला सुरुवात



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : डोंबिवली पश्चिम येथे महानगरपालिकांना मूलभूत सोयी सुविधांच्या विकास योजनेतून जुनी डोंबिवली प्रभाग क्र. ६४ येथे नव्याने २.५ लक्ष मि.ली. क्षमतेच्या जलकुंभाची उभारणी करण्यात येत आहे. रविवारी या जलकुंभाचे भूमिपूजन खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याहस्ते पार पडले. या जलकुंभाच्या उभारणीनंतर गणेश घाट सह डोंबिवली पश्चिमेतील सर्व नागरिकांची मुबलक पाण्याची सोय होणार आहे. यामुळे नागरिकांना मोठा जल दिलासा मिळणार आहे. भविष्यकाळात ही डोंबिवली शहराच्या विकासासाठी शिवसेना आणि आपले महायुती सरकार कटिबद्ध असल्याचे मत यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी व्यक्त केले.

यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष, आमदार रवींद्र चव्हाण, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, उपजिल्हा प्रमुख राजेश कदम, भाजपाचे शशिकांत कांबळे, दिपेश म्हात्रे तसेच शिवसेनेचे सागर जेधे यांच्यासह केडीएमसीचे दिग्विजय चव्हाण, कार्यकारी अभियंता शैलेश कुलकर्णी यांसह स्थानिक पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# तालयात्रा कार्यक्रमाने देवगंधर्व महोत्सवाची सांगता

## 'संगीत ययाती देवयानी' नाटकाचे देखील झाले सादरीकरण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : चोवीसाव्या देवगंधर्व महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात कल्याण गायन समाज प्रस्तुत 'संगीत ययाती देवयानी' या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. वि वा शिरवाडकर यांचे लेखन आणि पं जितेंद्र अभिषेकी यांचं संगीत म्हणजे दुग्ध शर्करा योग. हेमंत कर्णिक यांच्या दिग्दर्शनाखाली कल्याण गायन समाजाच्या तरुण चमूने अतिशय सुंदर सादरीकरण करून तमाम रसिकांची वाहवा मिळवली. या प्रयोगाचे वैशिष्ट्य म्हणजे कल्याण गायन समाजाच्या शतक महोत्सवी वर्षाचा व नाटकाच्या कथानकाचा उल्लेख करणारी नांदी खास या प्रयोगासाठी करण्यात आली होती.




महोत्सवाच्या शेवटच्या सत्रात प्रतिवर्षाप्रमाणे देवगंधर्व महोत्सवाच्या प्रथेनुसार स्मरणिकेचे प्रकाशन झाले. "शतायुषी गायन समाज" या विषयाला समर्पित अशा या स्मरणिकेचे प्रकाशन ज्येष्ठ तबलावादक तालयोगी पं सुरेश तळवलकर यांच्या शुभहस्ते झाले. कल्याण गायन समाजाचे अध्यक्ष डॉ. संदीप जाधव, महोत्सवाचे अध्यक्ष सीताराम कुंटे, उपाध्यक्ष डॉ नंजप्पा व माधव जोशी, विश्वस्त अॅड जल्लावार, कल्याण गायन समाजाचे प्रशांत दांडेकर, राम जोशी, स्वप्नील भाटे, स्मरणिकेचे संपादक अतुल वझे व स्मरणिकेचे मुद्रक आशिष देवधर हे यावेळी उपस्थित होते.

तालयोगी यांच्या संकल्पनेतून साकार झालेला तालयात्रा हा कार्यक्रम यानंतर सादर झाला. गायन, वादन, नृत्य या संगीताच्या तिन्ही अंगांचा समावेश असलेल्या ह्या कार्यक्रमाने सुरवातीपासून रसिकांना खिळवून ठेवलं. या कार्यक्रमात सत्यजीत तळवलकर यांची अचानक झालेली उपस्थिती हा रसिकांसाठी एक सुखद धक्का होता. पार्श्वभूमीवर चाललेला शाम कल्याण मधील तराणा आणि त्यावर सत्यजीत यांची पढंत श्रोत्यांना अक्षरशः स्तंभित करून गेली.


कार्यक्रमात शेवटी मल्हार रागातली शंकर अभ्यंकर यांची रचना सादर झाली. हा सांगीतिक संवाद आणि एकूणच महोत्सव संपू नये असं वाटत असतानाच या वर्षीच्या महोत्सवाची सांगता झाली. महोत्सवाच्या सर्व सत्रातील रंगमंच नेपथ्याची जबाबदारी राम जोशी यांनी तर प्रसिद्धीची बाजू अॅड. निखिल बुधकर, प्रशांत दांडेकर, मोहन उपासनी यांनी चोख सांभाळली. कार्यक्रमांच्या सर्व सत्रांचे सूत्र संचालन श्रीराम केळकर यांनी केले.

# माजी नगरसेवक मनोज राय आयोजित 'खेळ पैठणीचा'



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण(शरद शहाणे)** प्रभाग क्रमांक 14 मध्ये भारतीय जनता पार्टी माजी नगरसेवक मनोज राय, माझे नगरसेवक अनंत पावशे माजी नगरसेविका हेमलता पावशे आयोजित महिलांसाठी खास कार्यक्रम हे पैठणीचा लाडक्या बहिणींचा हा लोकप्रिय कार्यक्रम आयोजित केला होता महिलांसाठी पैठणी आणि इतर खास आकर्षक बक्षीस आयोजन केले होते महिलांसाठी विविध स्पर्धात्मक कार्यक्रम ठेवण्यात आले होते. कल्याण पूर्वेतील काटेमानीवली येथील पावशे मैदानात कार्यक्रमाचे आयोजन केले होते. शुक्रवार दिनांक 12 12. 2025 रोजी सायंकाळी सहा ते दहा वाजेपर्यंत सहभाग घेऊन आपला आनंद व्यक्त केला बक्षीस घेऊन हसतमुखाने घरी गेल्या. यावेळी मनोज राय म्हणाले की, आपल्या देशाचे पंतप्रधान जयंती म्हणतात सबका साथ सबका विकास या तत्वा नुसार आम्ही सदैव काम करत असतो. महिलांनी मनसोक्तरीत्या या खेळाचा आनंद घ्या कारण महिलांना स्वतःसाठी वेळ कधीच मिळत नाही. सदैव कामात आणि दुसऱ्यासाठी झटत असतात म्हणून या खेळाचा आनंद भरपूर घ्या आणि आनंदीत व्हा.




# पर्यावरण क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांसाठी संधी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : शुद्ध विज्ञान शाखेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण क्षेत्रात संशोधन, संवर्धन, धोरणनिर्मिती व क्षेत्रीय काम अशा अनेक संधी उपलब्ध आहेत, असा संदेश प्रमुख वक्त्या डॉ. शीतल पाचपांडे यांनी दिला. ब्ल्यू कार्बन परिसंस्था या विषयावर सखोल व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन करताना त्यांनी हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर तापमानवाढ, वाढते कार्बन उत्सर्जन आणि त्याचे पर्यावरणावर होणारे परिणामाविषयी माहिती दिली.

पर्यावरण दक्षता मंडळ, एन्विरो व्हिजिल, मुंबई विद्यापीठ, असोसिएशन ऑफ टीचर्स इन बायोलॉजिकल सायन्सेस आणि विद्याप्रसारक मंडळ संचलित बी. एन. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे प्राणिशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी डॉ. कुसुम गोखले स्मृती व्याख्यान पतंजली सभागृहात आयोजित करण्यात आले. डॉ. पाचपांडे यांनी ब्ल्यू कार्बन परिसंस्था या समुद्रकिनारी व खाडी परिसरातील मॅन्ग्रोव्ह, समुद्री गवत व दलदलीसारख्या परिसंस्थांमध्ये कार्बन साठविण्याची अत्यंत उच्च क्षमता असते, असे स्पष्ट केले.

या कार्यक्रमास पर्यावरण दक्षता मंडळाच्या अध्यक्ष डॉ. मानसी जोशी, उपाध्यक्ष डॉ. संजय जोशी, पर्यावरण दक्षता मंडळाचे सदस्य डॉ. उमेश मुंडले, बांदोडकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विंदा मांजरमकर, डॉ. चित्रा जोशी, डॉ. चैतन्य गोखले, डॉ. जयश्री मेनन उपस्थित होत्या. डॉ. जोशी यांनी खाडी स्वच्छ करण्यापेक्षा खाडीत कचरा टाकणे थांबवले, तर खाडी आपोआप स्वच्छ राहील, असा महत्त्वाचा संदेश त्यांनी दिला.

# अद्ययावत संगणकीकृत साधनसामग्रीसाठी ग्राम महसूल अधिकारी संपावर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा** : महसूल विभागात महत्वाची धुरा सांभाळणारे ग्राम महसूल अधिकारी अद्ययावत संगणकीकृत साधनसामग्रीसाठी संपावर गेल्याने गांव पाड्यातील महसूल कामकाज परिणाम होणार आहे

ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) व मंडळ अधिकारी हे ग्रामस्तरावर महसूल प्रशासनाची मुख्य जबाबदारी सांभाळत असून नागरिकांना तातडीच्या सेवा ई-फेरफार, ई-हक्क, ई-पिक पाहणी, सातबारा वाटप, तसेच नवीन ई-पंचनामा निरंतर सेवा प्रदान करीत आहेत त्यासाठी त्यांना अद्यावत संगणकीकृत साधनसामग्रीची अत्यावश्यकता आहे.मात्र जिल्ह्यातील बहुसंख्य ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांच्याकडे सन २०१६ ते१९ दरम्यान उपलब्ध झालेले लॅपटॉप व प्रिंटर आहेत. तसेच सदर लॅपटॉप व प्रिंटर कालबाह्य झालेले असून अशाही परिस्थितीत ७/१२, ८ अ व फेरफार यांच्या नक्कल वितरणाची फी ही ग्राम महसूल अधिकारी दरमहा शासन जमा करत आहेत. शासन निर्णय दि.१/८/२०११ नुसार अशा आयटी उपकरणांचे आयुष्यमान ५ वर्षे इतके निश्चित करण्यात आले आहे. तेव्हापासून आजपर्यंत ६-९ वर्षांचा कालावधी लोटलेला असून बहुतांश उपकरणे पूर्णतः कालबाह्य, नादुरुस्त व निकृष्ट अवस्थेत आहेत. काही उपकरणे चालू असली तरी त्यांची सिस्टम व्हर्जन, स्पीड व क्षमता ही अद्ययावत शासन प्रणालीच्या किमान निकषांनाही पूरक नाही. काही उपकरणे चालू असली तरी त्यांची कार्यगती इतकी कमी आहे की ई-फेरफार, ई-हक्क, ई-पिकपाहणी, ई-पंचनामा यांसारख्या सुधारीत प्रणालींवर काम करणे, ऑनलाइन प्रणालीतील नोंदी करणे, प्रस्ताव मंजूर करणे व आवश्यक सेवा वेळेत देणे अशक्यप्राय झाले आहे. ही स्थिती ई-शासन प्रणालीवरील शासनाच्या विश्वासार्हतेलाही तडा पोहोचवणारी आहे.तर कालबाह्य व नादुरुस्त उपकरणांवर काम करणे म्हणजे कर्मचाऱ्यांना अधिकाऱ्यांकडून झालेल्या प्रचंड कामकाजाच्या ताणामुळे कर्मचाऱ्यांमध्ये मानसिक तणाव, असंतोष आणि शासनाबद्दल तीव्र नाराजी वाढलेली आहे. नादुरुस्त साधनांसह प्रचंड कार्यभार पूर्ण करण्याचा ताण कर्मचाऱ्यांमध्ये मानसिक ताण, शासनाविषयी तीव्र असंतोष, क्षेत्रीय कामकाजावरील उदासीनता. निर्माण होण्यास कारणीभूत ठरत आहे. तसेच नवीन भरतीतील ग्राम महसूल अधिकाऱ्यांना ६-७ महिने उलटूनही अद्यापही संगणकीय साधने उपलब्ध नाहीत. यामुळे क्षेत्रीय कामकाज ठप्प असून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा गंभीररित्या बाधित होत आहेत.तसेच महाराष्ट्र राज्य तलाठी संघ तसेच ठाणे जिल्हा तलाठी संघाकडून अनेकवेळा निवेदन देऊनही आजतागायत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. महाराष्ट्र राज्य तलाठी संघाकडून १७ ऑक्टोबंर २०२५ रोजी जमाबंदी आयुक्त पुणे यांना निवेदन देऊन १५ नोव्हेंबरपर्यंत साधने न मिळाल्यास ऑनलाइन कामकाज बंद करण्याचा इशारा देण्यात आला होता.त्यावेळी जमाबंदी आयुक्त, पुणे यांनी २७ ऑक्टोबंर २०२५ रोजी निविदा प्रक्रीया पूर्ण होऊन नोव्हेंबर च्या पहिल्या आठवड्यामध्ये प्रत्यक्षात लॅपटॉप व प्रिंटर कम स्कॅनर वाटपास सुरुवात होईल असे संघटना पदाधिकाऱ्यांना आश्वासन दिले होते. परंतु शासन स्तरावर आदेश पारीत होऊनही अद्यापपावेतो पुढील कुठलीही कार्यवाही होत नसल्याने राज्यातील ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांच्यासह नाईलाजाने दि.१५ डिसेंबर २०२५ पासून भिवंडी तालुक्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी आपापली DSC तहसील कार्यालयात जमा करून ऑनलाईन कामकाज पूर्णत बंद करुन आंदोलनास प्रारंभ करत असल्याचे निवेदन महाराष्ट्र राज्य तलाठी संघ भिवंडी शाखेचे निवेदन भिवंडी तहसीलदार अभिजीत खोले यांना देण्यात आले आहे. तसेच कालबाह्य उपकरणांची विल्हेवाट प्रक्रिया त्वरित पूर्ण करून निर्णयानुसार नवीन लॅपटॉप व प्रिंटर ची GeM पोर्टलद्वारे खरेदी प्रक्रिया तात्काळ सुरू करून ते सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकाऱ्यांना उपलब्ध करून द्यावेत अशी मागणी करण्यात आली.

**महाराष्ट्र राज्य तलाठी संघ भिवंडी शाखेचे तहसीलदारांना निवेदन**



# सुनील उतेकर कोकण रत्न पुरस्काराने सन्मानित

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण :** कल्याण सावंतवाडी रेल्वे प्रवासी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुनील उतेकर यांना स्वतंत्र कोकण राज्य अभियान या संस्थेकडून कोकण रत्न पुरस्कार देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले. मुंबई मराठी पत्रकार भवन, आझाद मैदान येथे झालेल्या कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी सतीश मोरे, मनीष कानविलकर, गणेश कांबळे, सुरेश आहिरे, सुनिता उतेकर आदींसह अनेक संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. त्यांनी उतेकर यांना पुढील कामासाठी शुभेच्छा दिल्या. उतेकर हे रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील साखर बामणवाडी या ग्रामीण भागातून येऊन कल्याण शहरात सतत राजकीय सामाजिक कार्य करत आहेत. कल्याण सावंतवाडी रेल्वे सामाजिक संस्था स्थापन केली आहे. त्या संस्थेमार्फत कोकणातल्या भूमिपुत्रांसाठी कोकणात जास्तीत जास्त गाड्या सोडाव्या या प्रमुख मागण्या सतत रेल्वे विभागाकडे व आमदार खासदार यांच्याकडे करत असतात. कोकण उत्सव कार्यक्रम घेऊन कोकणातली परंपरा ते सतत जोपासत असतात. कल्याण शहरातील वालधुनी नदी पुनर्जीवित करण्यासाठी व नागरिकांच्या हक्कासाठी सतत लढत असतात. त्यांच्या या कार्याची दखल घेत कोकण राज्य अभियानतर्फे संस्थेचे



प्रमुख पदाधिकारी धनंजय कुवेसकर, राजेंद्र सुर्वे, सुधाकर राणे, दिलीप लाड यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांना कोकण रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# श्रमजीवी संघटनेच्या वतीने बालकलाक्रिडा मेळावा



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : श्रमजीवी संघटना आयोजित भव्य बालकलाक्रिडा मेळावा टिटवाळा गणेश विद्यालय हायस्कूल मैदान या ठिकाणी रविवारी पार पडला. या क्रीडा मेळाव्याप्रसंगी कल्याण तालुका वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंकज गिरी तसेच तालुका वैद्यकीय अधिकारी मुंजाल यांच्यासह श्रमजीवी संघटना ठाणे जिल्हा सरचिटणीस राजेश चन्ने, तालुका अध्यक्ष वासुदेव वाघे, उपाध्यक्ष कांचन मुकणे, महिला प्रमुख रूपाली वाघे, आनिता वायडे, संतोष वाघमारे, अरुण वाघमारे व संघटनेचे कल्याण तालुका कार्यकर्ते पदाधिकारी त्यांची उपस्थिती होती. या क्रीडा मेळाव्यामध्ये आदिवासी मुलांचे सांघिक स्पर्धा कबड्डी, लंगडी, खोखो, डॉजबॉल, तसेच वैयक्तिक खेळ गोळा फेक, चमचागोटी, पोता शर्यत, बटाटा शर्यत, लांब उडी उंच उडी 100 मीटर धावणे इत्यादी खेळ घेण्यात आले. या क्रीडा मेळाव्याच्या समारोप कार्यक्रमासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिका माजी नगरसेवक संतोष तरे, श्रमजीवी संघटना महाराष्ट्र राज्य सरचिटणीस बाळाराम भोईर यांनी उपस्थित राहून खेळाडूंना मार्गदर्शन केले.

# सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात प्राचीन युद्धकलेचा जागर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता** - दिल्लीतील भारत मंडपम् येथे 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत फाउंडेशन' आणि 'सनातन संस्था' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात' भारताच्या गौरवशाली प्राचीन युद्धपरंपरा आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील शौर्याचा सजीव, थरारक आविष्कार पाहायला मिळाला. या महोत्सवाने उपस्थितांमध्ये वीरश्री, राष्ट्रभक्ती आणि आत्मसंरक्षणाची तीव्र जाणीव जागवली.

महोत्सवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या शस्त्रकौशल्याचे प्रभावी प्रदर्शन, मणिपूर राज्याच्या पारंपरिक थांग-ता युद्धकलेचे तलवार, भाला व ढालींसह सादरीकरण, तसेच हिंदु जनजागृती समितीच्या माध्यमातून महिलांची छेडछाड व धर्मांधांकडून होणाऱ्या अत्याचारांना प्रतिकार करण्याची वास्तवदर्शी प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

विशेष आकर्षण ठरले ते अफजलखान वधाचे रोमांचकारी सजीव चित्रण! पहेलगाम येथील दहशतवादी आक्रमणाला शिवकालीन रणनितीच्या माध्यमातून कसे चोख प्रत्युत्तर देता येऊ शकते, हे स्वसंरक्षणाच्या विविध प्रकारांसह




प्रभावीरीत्या मांडण्यात आले. या सादरीकरणामुळे उपस्थित प्रेक्षक थरारून गेले.

मणिपुरी थांग-ता युद्धकलेतील तलवार (थांग), भाला (ता), ढाल आणि युद्धतंत्र यांचे शास्त्रशुद्ध, शौर्यपूर्ण सादरीकरण महोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरले. कोल्हापूरस्थित 'सव्यासची गुरुकुलम' संस्थेच्या वतीने सादर करण्यात आलेल्या शौर्यप्रदर्शनात शिवकालीन युद्धतंत्र आणि मराठी शस्त्रपरंपरेचा प्रभावी समन्वय साधण्यात आला. यामध्ये शस्त्रांचा प्रत्यक्ष वापर, संकटसमयी आत्मरक्षण, महिलांवरील छेडछाडीच्या प्रसंगी बचाव, तसेच अनेकांकडून होणाऱ्या आक्रमणाला धैर्याने प्रतिकार कसा करावा, याची सजीव प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

यासोबतच ऋषी-मुनींनी सांगितलेल्या सूर्यनमस्कार, चंद्रनमस्कार, भूमीनमस्कार तसेच विविध पारंपरिक व्यायामप्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. या व्यायामपद्धती शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल साधणाऱ्या असून भारतीय संस्कृतीतील आरोग्य व शौर्य यांचा अविभाज्य संबंध अधोरेखित करतात.

या वेळी भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते व खासदार श्री. सुधांशू त्रिवेदी, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक, प.पू. शांतिगिरी महाराज, पू. पवन सिन्हा गुरुजी, हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय मार्गदर्शक (डॉ.) चारुदत्त पिंगळे, सनातन संस्थेच्या उत्तराधिकारी श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ आणि श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ यांच्यासह हजारो धर्मप्रेमी नागरिक उपस्थित होते.

# राष्ट्रवादी पक्ष आयोजित कल्याण पश्चिममध्ये आरोग्य शिबीर



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण पश्चिम येथे ब्राह्मण सोसायटीच्या सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आयोजित मोफत आरोग्य शिबीर आणि उपचार हा कार्यक्रम उदय गणपत जाधव अध्यक्ष विधानसभा क्षेत्र कल्याण, जिल्हाध्यक्ष कामगार कल्याण, आणि सौ. नंदिनी उदय जाधव, उपाध्यक्ष महिला कल्याण विधानसभा क्षेत्र कल्याण पश्चिम, मोफत आरोग्य शिबिर, तपासणी आहे आणि उपचार हा कार्यक्रम आयोजित केला होता.

हा कार्यक्रम रविवार दिनांक 14 .12 .2025 रोजी सकाळी दहा ते दोन वाजेपर्यंत घेण्यात आला होता जेणेकरून रविवारी सुट्टीचा दिवस असल्याने जास्तीत जास्त नागरिकांना या सेवेचा लाभ घेता येईल . सध्या महागाईच्या दिवसात औषध आणि उपचार होत चालले, व्याधी मात्र वाढल्या ज्येष्ठ नागरिक, महिला, अशा सर्वांनीच या सेवेचा लाभ घेतला. रक्तदाब, रक्तगट, मधुमेह तपासणी, नेत्र तपासणी आणि मोफत चष्मे वाटप करण्यात आले..

# कल्याण पूर्वेतील जाईबाई शाळेत सकारात्मक शिस्त या विषयावर परिषद संपन्न

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : विद्यार्थ्यांवरील शारीरिक शिक्षेच्या घटना समोर येत असून या पार्श्वभूमीवर शासकीय परिपत्रकानुसार निर्देशित सकारात्मक शिस्त या विषयावरील परिषद कल्याण पूर्वेतील जाईबाई केंद्रशाळा येथे नुकतीच आयोजित करण्यात आली होती.

महाराष्ट्र राज्यातील काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांवरील शारीरिक शिक्षेच्या घटना समोर येत असून समाजात याविषयीची चिंता व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, सुरक्षा आणि शिक्षक-विद्यार्थी नाते बळकट करण्यासाठी सकारात्मक शिस्त ही संकल्पना अत्यावश्यक आहे. राज्यातील सर्व जिल्हे, तालुके अथवा केंद्रस्तरावरील शिक्षण परिषदांमध्ये 'सकारात्मक शिस्त' या विषयावर 45मिनिटांचे विशेष सत्र आयोजित करण्याबाबत शासनस्तरावरून निर्देश देण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने कल्याण



डोंबिवली महानगरपालिका शिक्षण मंडळ शिक्षण अधिकारी विजय सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण पूर्वेतील जाईबाई केंद्र शाळा येथील केंद्रप्रमुख भगवान हमरे यांनी या सत्राचे आयोजन केले होते.दीपप्रज्वलनाने सुरुवात करून भगवान हमरे यांनी केंद्रसंमेलनाविषयी उपस्थित शिक्षक व मुख्याध्यापक वर्गास संबोधित करत प्रास्ताविक मांडले. या सत्रासाठी विशेष व्याख्याता म्हणून गणेश विद्यामंदिरच्या ललिता मोरे यांना निमंत्रित करण्यात आले होते. अलीकडील घटनांचा संदर्भ घेऊन त्यांनी शिक्षकांची संवेदनशीलता वाढवत मुलांना करण्यात येणाऱ्या शिक्षेचे प्रकार त्याचे परिणाम स्पष्ट केले. नंतर सकारात्मक शिस्तीचे मार्ग, विविध तंत्रे आणि त्यावरील उपाययोजना यांचा सखोल विचार शिक्षकांसमोर मांडले.

अंशू शुक्ला नूतन हिंदी स्कूल माध्यमिक मुख्याध्यापिका व अनुप्रिता पटवर्धन नूतन हिंदी स्कूल प्राथमिक मुख्याध्यापिका यांनी संवाद, सहकार्य आणि समुपदेशन यावर आधारित वर्ग व्यवस्थापन याविषयी विचार मांडले. गुरु इसामे केडीएमसी शिक्षण मंडळ यांनीही शिक्षकांशी संवाद साधला. या चर्चासत्रामध्ये एकूण 14 शाळांचे 60 शिक्षक आणि मुख्याध्यापक उपस्थित होते.

# भिवंडीत पोलीस बंदोबस्तात बजरंग दलाचे शौर्य संचालन

## पाच हजार बजरंगी सहभागी..

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : कल्याण,अंबरनाथ आणि भिवंडी या तीन बजरंग दलाच्या विभागाचेवतीने शौर्य संचलन यात्रा मोठ्या उत्साहात व शिस्तबद्धपणे संपन्न झाली. या संचलनातील सर्व बजरंगी सेवकांचे सभेत रूपांतर झाले. सुमारे पाच हजारांहून बजरंगीच्या संचलनात सहभागी झाले होते.

हिन्दूत्ववादी व राष्ट्रीय हिताचे कार्य करणारे संघटन म्हणून विश्‍व हिंदू परिषदची ओळख आहे. विश्‍व हिंदू परिषदेने हिंदूत्व व राष्ट्रीय विचारधारा समाजामध्ये रुजविण्या करिता वेळोवेळी धार्मिक, सामाजिक व देशहिता करिता वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. या वर्षी भिवंडीत विश्‍व हिंदू परिषद अंतर्गत बजरंग दल



व्दारा गीता जयंती निमित्ताने कल्याण विभागाचे (भिवंडी, कल्याण, अंबरनाथ) बजरंग दल शौर्य संचलन संपन्न झाले. काल सायंकाळी चाचा नेहरु हाईस्कुल खडकरोड, गुरुदेव स्विटस्, तिनबत्ती, पारनाका बाजारपेठ झेंडानाका, टिळक चौक, कासार आळी या मार्गे हे संचालन पुढे कोंबडपाडा भागातून छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गाने चाचा नेहरू हाइस्कूल प्रांगणात येऊन तेथे महासभेत रूपांतर झाले. या संचलनात सुमारे पाच हजारांहून अधिक बजरंगी सामील झाले होते. या सभेमध्ये महंत चिदानंद सरस्वती महाराज (चिंतामणी महाराज), कोंकण प्रांत महामंत्री श्रीराज नायर,देवराज महाराज केणे आदी मान्यवरांनी आपल्या भाषणातून हिंदू समाजाला देव-देश धर्माच्या कार्यासाठी संबोधित केले.यावेळी अँड.मनोज रायचा,देवराज राका,संदीप भगत, अशोक जैन यांच्या सह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. संचलन निमित्ताने भिवंडीत कडक पोलीस बंदोबस्त तैणात करण्यात आला होता. संचालना दरम्यान बजरंगीनी दिलेल्या घोषणांनी परिसर दुमदुमून निघाला होता.

# ह.भ.प.छगन महाराज शेळके यांची स्टार प्रवाह मराठी वाहिनीवर कीर्तन सेवा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : "संताची बोली विठ्ठलाची गोडी" या स्टार प्रवाह मराठी वाहिनीवर सध्या प्रसारित होत असलेल्या किर्तन मालिकेत मुरबाड तालुक्यातील थोर सामाजिक प्रबोधनकार,ज्ञानेश्वरी कंठभूषण,प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. छगन महाराज शेळके यांची गोड किर्तन सेवा 19 व 20 डिसेंबरला स्टार प्रवाह मालिकेवर सकाळी 6.30 वा. प्रसारित केली जाणार आहे.



गेल्या काही वर्षात मुरबाड तालुक्यासह संपुर्ण ठाणे जिल्हा व महाराष्ट्रात छगन महाराज शेळके हे आपल्या अमोघ अशा गोड वाणीने अध्यात्मिक व विठ्ठल भक्तीचे विचार गावोगावी जाऊन आपल्या कीर्तनरूपी सेवेतून करत आहेत. सामाजिक प्रबोधनाचे एक मोठे काम सध्या त्यांच्या हातून होत आहे. यापुर्वी त्यांची" झी "टॉकीजवर सुद्धा नाचू कीर्तनाच्या रंगी या कार्यक्रमा मध्ये किर्तन सेवा प्रसारित झाली आहे.आता 19 व 20 डिसेंबर 2025 स्टार प्रवाहावर दोन दिवस कीर्तन प्रसारित होणार असून प्रसिद्ध पखवाज वादक हभप सुधिर कराळे यांची पखवाज साथ लाभली आहे. समस्त मुरबाड करांसाठी व वारकरी सांप्रदयासाठी ही निश्चितच अभिमानाची गोष्ट आहे.सर्वांनी आवर्जून हे कीर्तन श्रवण करावे असे आवाहन छगन महाराज शेळके यांनी केले आहे.

# आरोग्य विभागातर्फे जनजागृती सप्ताह

## नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : जिल्हा आरोग्य विभागामार्फत सिकलसेल, थॅलेसेमिया व हेमोफिलिया या अनुवंशिक रक्तविकारांविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी ११ ते १७ डिसेंबर २०२५ दरम्यान जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानाद्वारे नागरिकांमध्ये तपासणी, निदान आणि उपचाराबाबत जागरूकता वाढविण्यावर भर दिला जात आहे.जिल्ह्यात सध्या एकूण ५१० सिकलसेल वाहक आणि ५७ सिकलसेल ग्रस्त रुग्ण आढळले आहेत. त्यापैकी २२ रुग्णांना 'हायड्रॉक्सियुरिया' हे औषध उपचारासाठी सुरू करण्यात आले असून त्यांच्या आरोग्यात उल्लेखनीय सुधारणा झाल्याचे आरोग्य विभागाने सांगितले. तसेच इतर रुग्णांना नियमित फॉलिक ॲसिड देण्यात येत आहे. जिल्ह्यात सर्व गर्भवती महिलांची प्रसूतीदरम्यान सिकलसेल तपासणी केली जाते आणि जर त्या वाहक अथवा रुग्ण आढळल्या, तर त्यांच्या पतीचीही तपासणी करण्यात येते.

**अभियानाचे उद्दिष्ट:**

रक्ताशी संबंधित अनुवंशिक आजारांचे लवकर निदान, तपासणीचे प्रमाण वाढविणे आणि उपचार सुविधा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे हा या अभियानाचा प्रमुख हेतू आहे.या आठवड्यात सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालयात पुढील उपक्रम राबविले जात आहेत –सिकलसेल, थॅलेसेमिया, हेमोफिलिया तपासणी शिबिरे. हिमोग्लोबिन चाचणी (HPLC) आणि सिकलसेल सॉल्युबिलीटी टेस्ट.

आजाराची लक्षणे, प्रसार व प्रतिबंध याविषयी जनजागृती.

गर्भवतींसाठी विशेष तपासणी व समुपदेशन ,शाळा-महाविद्यालयांत माहितीपर व्याख्याने,रुग्ण व कुटुंबीयांसाठी समुपदेशन,विवाहपूर्व रक्त तपासणीचे महत्त्व पटवून देणारी मोहीम.हे तिन्ही आजार अनुवंशिक असून, तपासणीमुळे त्यांचे लवकर निदान शक्य होते. दोन्ही पती-पत्नी वाहक असल्यास त्यांच्या बाळामध्ये आजाराचा धोका वाढतो. नियमित तपासणी, वेळेवर उपचार आणि समुपदेशनामुळे आजाराचे दुष्परिणाम कमी करता येतात. सरकारकडून तपासणी व उपचाराची सुविधा उपलब्ध आहे.

रोगांची लक्षणे थोडक्यात:

**सिकलसेल:** हात-पाय दुखणे, अशक्तपणा, पिवळे पडणे, वाढ खुंटणे, वारंवार आजारी पडणे.

**थॅलेसेमिया:** जास्त अशक्तपणा, पोटाला सूज, हाडांचे बदल, वाढ खुंटणे.

**हेमोफिलिया:** किरकोळ जखमेवर जास्त रक्तस्राव, सांध्यात सूज, नाकातून वारंवार रक्त येणे, शस्त्रक्रियेवेळी रक्तस्राव वाढणे. लग्नापूर्वी दोघांची रक्त तपासणी करणे आणि गर्भवती स्त्रियांनी Hb Electrophoresis चाचणी वेळेत करणे अत्यंत आवश्यक असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांनी नमूद केले आहे. वेळेवर निदान आणि उपचार केल्यास रुग्ण सामान्य, आरोग्यदायी जीवन जगू शकतो.

जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या जनजागृती आठवड्यात सक्रीय सहभाग नोंदवावा, तसेच जवळच्या आरोग्य केंद्रात जाऊन सिकलसेलची तपासणी करून घ्यावी, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे.

# पाच लाख ८७ हजारांच्या ऐवजावर सुरक्षा रक्षकांचा डल्ला

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर** : नेवाळी पाडा येथे ऊर्जा मार्ग लिमिटेड या कंपनीच्या टॉवर्सचे साहित्य सिक्युरिटी गार्डने चोरून नेले. याप्रकरणी हिललाइन पोलिस ठाण्यात दोन सिक्युरिटी गार्डवर गुन्हा दाखल झाला.

उल्हासनगर हिललाईन पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नेवाळी पाडा ग्रामपंचायतसमोर ऊर्जा मार्ग लिमिटेड कंपनीचे टॉवर पार्ट व हार्डवेअर फिटिंग कंपनी प्रतिनिधीच्या तक्रारीवरून हिललाइन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

साहित्य ठेवले. या साहित्यावर देखरेख करण्यासाठी सुनील मेटकर व भीमराव आत्रम यांची सिक्युरिटी गार्ड म्हणून काम करत होते. २ ते ४ डिसेंबरदरम्यान ५ लाख ८७ हजार १५४ रुपयांचे साहित्याची चोरी झाली. हे साहित्य सिक्युरिटी गार्डने चोरून नेल्याचा संशय कंपनीचे दीपककुमार यादव यांना आला.




# आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वारली चित्रकला साहित्याचे वाटप

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**झिडके-अंबाडी :** तानसा खोऱ्यातील आदिवासी विद्यार्थ्यांमधील उपजत कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठीच " "प्रसाद चिकित्सा गणेशपुरी संस्थेने" पुढाकार घेतला आहे.संस्थेच्या वतीने मौजे-गोराड,नांदणी,मेढे आणि सायवन येथील शाळांमधून एकूण-180 विद्यार्थ्यांना वारली चित्रकला शिकण्यासाठी आवश्यक असलेले साहित्य नुकतेच वितरीत करण्यात आले.या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या सांस्कृतिक परंपरेशी जोडणाऱ्या वारली चित्रकलेचे शिक्षण घेणे सोपे होणार आहे.

प्रसाद चिकित्सा संस्थेचे कार्यकारी व्यवस्थापक " मिलिंद नरगुंद " आणि वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक वंदना मौर्या यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर साहित्याचे वाटप करण्यात आले.





त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना चित्रकलेचे महत्त्व पटवून दिले,आणि कला जोपासण्यासाठी प्रोत्साहित केले.ज्या शाळेत सदर साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता,त्या शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद उपस्थित होते.प्रसाद चिकित्सा संस्थेकडून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी करण्यात आलेल्या सहकार्याबद्दल शिक्षकांच्या वतीने संस्थेचे मनःपुर्वक कौतुक त्याचबरोबर आभारही व्यक्त केले.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024